


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ५५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.०८ ऑक्टोबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# सामान्य पुणेकराला त्रास नको !

## पुण्यातील एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर मुंबई हायकोर्टाचे महत्त्वाचे निर्देश

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, पुणे :** पुण्यात सुरु असलेल्या एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर मुंबई हायकोर्टाने महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. एमपीएससी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पुणेकरांच्या जनजीवनावर परिणाम होणार नाही, याची जबाबदारी आंदोलक आणि प्रशासन दोघांवरही राहणार आहे. शांततापूर्ण आणि कायदेशीर आंदोलनाचा अधिकार असल्याचे हायकोर्टाने स्पष्ट केले आहे. मात्र पूल, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी अडथळे निर्माण करून पुणेकरांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होऊ नये, अशी स्पष्ट भूमिका न्यायालयाने स्पष्ट केली आहे. पुणे शहरातील जनजीवन ठप्प होईल, अशी कोणतीही परिस्थिती निर्माण होऊ नये, असे हायकोर्टाने नमूद केले आहे.

**आंदोलकांच्यावतीने कोर्टात हमी**

आंदोलनकर्त्यांच्या वकिलांनी न्यायालयाला सकारात्मक आश्वासन दिले आहे. आंदोलन कायदेशीर मार्गाने आणि सक्षम प्राधिकरणांची योग्य परवानगी घेऊनच केले जाईल, अशी आंदोलकांच्या वतीने हमी देण्यात आली आहे. सामान्य पुणेकरांचे दैनंदिन जीवन आणि कामकाज सुरळीत राहणे आवश्यक, असे न्यायालयाने अधोरेखित केले.

**हायकोर्टाचे राज्य सरकारला आदेश**

रस्ते, पूल आणि सार्वजनिक ठिकाणी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी राज्य सरकारने योग्य उपाययोजना कराव्यात, असे निर्देश हायकोर्टाने दिले आहेत. सामान्य नागरिकांना प्रवासात किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, याची खबरदारी घ्या, असा आदेश कोर्टाने दिला आहे. आंदोलनाचा अधिकार मान्य करतानाच सामान्य नागरिकांच्या हक्कांचे संरक्षणही महत्त्वाचे, असा हायकोर्टाचा स्पष्ट संदेश आहे.

**हायकोर्टाचे विद्यार्थ्यांनाही निर्देश**

विद्यार्थ्यांना शांततापूर्ण व कायदेशीर आंदोलनाचा अधिकार आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.



विद्यार्थ्यांच्या बहुतांश मागण्यांवर राज्य सरकारने कार्यवाही सुरू केली असून, विद्यार्थ्यांनी वर्गाकडे परतावे, असे न्यायालयाचे मत आहे. रस्ते, पूल किंवा सार्वजनिक ठिकाणे अडवून पुण्याचे जनजीवन विस्कळीत करता येणार नाही. आंदोलन परवानगी असलेल्या ठिकाणीच करावे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

**राज्य सरकारला प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश**

वाहतूक सुरळीत ठेवण्याची जबाबदारी राज्य सरकारची असल्याचे न्यायालयाने नमूद केले. पेपरफुटी प्रकरणात जबाबदारी निश्चित करून तत्पर तपास करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. रिक्त पदे, परीक्षा, तपास आणि एमपीएससी अध्यक्षांवरील कारवाईबाबत राज्याला तीन आठवड्यांत प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश हायकोर्टाने दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी २५ नोव्हेंबर २०२६ रोजी होईल, असंदेखील सांगण्यात आलं.

# वडार समाजाच्या कष्टाला महाराष्ट्र सरकारची साथ; उत्खनन मर्यादा ५०० ब्रासपर्यंत!

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.०७, पुणे :** वर्षानुवर्षे दगड फोडत, उन्हातान्हात घाम गाळत आणि आपल्या श्रमाच्या जोरावर कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या वडार समाजासाठी महाराष्ट्र सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ६ ऑक्टोबर रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत वडार समाजाच्या पारंपरिक दगडफोडी व उत्खनन व्यवसायाशी संबंधित महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. गौण खनिजांच्या उत्खननासाठी स्वामित्वधन अर्थात रॉयल्टी सवलतीची वार्षिक मर्यादा २०० ब्रासवरून ५०० ब्रास करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

या निर्णयासाठी महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यात येणार आहेत. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांना पारंपरिक व्यवसायातून अधिक उत्खननाची मर्यादा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

वडार समाजातील अनेक कुटुंबांचा पारंपरिक व्यवसाय आजही दगडफोडी, उत्खनन आणि त्यासंबंधित कामांवर अवलंबून आहे. मात्र वाढती महागाई, डिझेल, वाहतूक, मजुरी तसेच दगडफोडीसाठी लागणारी अवजारे आणि यंत्रसामग्री यांच्या खर्चात



मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे पूर्वीची २०० ब्रासची मर्यादा अपुरी पडत असल्याची मागणी समाजाच्या विविध स्तरांतून सातत्याने करण्यात येत होती.

या पार्श्वभूमीवर राज्य मंत्रिमंडळाने मर्यादा वाढवून ५०० ब्रास करण्याचा निर्णय घेतल्याने पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. या निर्णयामुळे पात्र कुटुंबांना आपल्या व्यवसायाचा विस्तार करण्याची तसेच उत्पन्न वाढविण्याची संधी उपलब्ध होऊ शकते.

दगड फोडणाऱ्या हातांच्या श्रमाला शासनाच्या निर्णयाची जोड मिळणे हा या निर्णयाचा महत्त्वाचा पैलू आहे. पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या छोट्या कुटुंबांची मोठ्या व्यावसायिक खाणपट्टा धारकांशी थेट स्पर्धा होत असल्याने त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यामुळे वाढविण्यात आलेली उत्खनन मर्यादा त्यांच्या आर्थिक स्थितीसाठी कितपत उपयुक्त ठरते, हे प्रत्यक्ष अंमलबजावणीनंतर स्पष्ट होणार आहे.

मात्र वडार समाजाच्या अपेक्षा केवळ उत्खननाच्या मर्यादेपुरत्या मर्यादित नाहीत. समाजातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, युवकांना रोजगार व कौशल्यविकास, कुटुंबांना घरकुल, आरोग्य सुविधा आणि पारंपरिक व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळावी, अशीही मागणी आहे.

दगड फोडणाऱ्या हातांना केवळ सवलत नव्हे, तर आर्थिक स्थैर्याची संधी मिळणे आवश्यक आहे. पुढच्या पिढीला शिक्षण, रोजगार आणि व्यवसायाच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या, तरच आजच्या निर्णयाचे दीर्घकालीन सामाजिक परिणाम दिसून येतील.

मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे वडार समाजाच्या दीर्घकाळ प्रलंबित मागणीला प्रतिसाद मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. आता या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासनाकडून किती वेगाने होते, पात्र कुटुंबांपर्यंत त्याचा लाभ किती पारदर्शकपणे पोहोचतो आणि शासनाच्या या निर्णयातून प्रत्यक्षात किती कुटुंबांना आर्थिक फायदा होतो, याकडे संपूर्ण वडार समाजाचे लक्ष लागले आहे.

# लासलगाव बाजार समितीत शेतमाल तारण कर्ज योजना सुरू : डी.के.जगताप

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०७, लासलगाव (नाशिक) :** सध्या खरीप हंगामातील मका, सोयाबीन, तूर, मूग, उडीद, बाजरी व करडई या पिकांची काढणी अंतिम टप्प्यात आहे. हा सर्व शेतमाल एकाच वेळी बाजारात विक्रीसाठी आल्यास आवक वाढून दर कोसळण्याची शक्यता असते. परिणामी, शेतकरी बांधवांचे होणारे मोठे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने सन २०२६-२७ या हंगामाकरिता शेतमाल तारण कर्ज योजना सुरू केली आहे, अशी माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर (डी. के.) जगताप यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांच्या सहकार्याने सन १९९०-९१ पासून ही योजना राबवली जात आहे. या योजनेचा लाभ केवळ उत्पादक शेतकऱ्यांनाच मिळणार आहे.

**योजनेचे स्वरूप व प्रमुख अटी:**

पात्र पिके: मका, सोयाबीन, तूर, मूग, उडीद, ज्वारी, बाजरी आणि करडई.




**प्रतवारी व मूल्यांकन :** शासकीय व बाजार समितीच्या प्रतवारीकारांनी संयुक्तरित्या शिफारस केलेला माल महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या गोदामात ठेवला जाईल. महामंडळाच्या गोदामात माल ठेवल्याच्या दिवशीचा सरासरी बाजारभाव अथवा किमान आधारभूत किंमत (चडझ) यांपैकी जो दर कमी असेल, तो गृहीत धरला जाईल.

**कर्ज मर्यादा :** शेतकऱ्याचा खाते उतारा, ७/१२ वरील पीक पेरा आणि प्रत्यक्ष उत्पादित माल यांची पडताळणी करून एकूण मूल्याच्या ७५ टक्के रक्कम तारण कर्ज म्हणून धनादेशाद्वारे दिली जाईल.

**व्याजदर रचना :**

पहिले ६ महिने: ६% व्याजदर

पुढील ६ महिने (७ ते १२ महिने): ८% व्याजदर

त्यापुढील ६ महिने (१३ ते १८ महिने): १२% व्याजदर

**टीप :** १८ महिन्यांनंतर कर्जास कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही.

शेतकऱ्यांनी बाजारातील मंदीच्या काळात शेतमालाची घाईगडबडीत विक्री न करता, तो वखार महामंडळात सुरक्षित ठेवून या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर (डी. के.) जगताप, उपसभापती संदीप (ललित) दरेकर व सचिव नरेंद्र वाढवणे यांनी केले आहे.

**अधिक माहिती व संपर्कासाठी :** योजनेच्या सविस्तर माहितीसाठी लासलगाव बाजार समितीच्या मुख्य कार्यालयात अथवा ९९२१४२३५३६ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

# अंमली पदार्थ गुन्ह्यांच्या जलद सुनावणीसाठी विशेष न्यायालय

**अक्षराज : जे. के. पोळ**



**दि.०७, मुंबई :** राज्यातील अंमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांची सुनावणी जलदगतीने व्हावी आणि अशा प्रकरणांचा वेळेत निपटारा व्हावा, यासाठी विशेष नामनिर्देशित न्यायालय स्थापन करण्याच्या प्रक्रियेला गती देऊन ६ ऑगस्ट २०२६ रोजी नार्कोटिक ड्रग्स अँड सायको ट्रॉपिक सब स्टान्सेस ॲक्ट अंतर्गत पुणे येथे विशेष न्यायालय स्थापन करण्यात आले आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री असताना पुढाकार घेतला होता.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री असताना यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण विभागाला सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून केंद्र शासनाकडे सादर करण्याचे तसेच या प्रस्तावाचा वैयक्तिक स्तरावर पाठपुरावा करण्याचे निर्देश दिले होते.

अंमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांच्या जलद सुनावणीसाठी महाराष्ट्रात विशेष नामनिर्देशित न्यायालय स्थापन करण्याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी निर्देश दिले होते.

या महत्त्वाच्या विषयावर कार्यवाहीला गती देण्यासाठी विशेष न्यायालयाच्या स्थापनेसंदर्भातील सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करावा, तो केंद्र शासनाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडे सादर करावा आणि प्रस्ताव मंजुरीसाठी आवश्यक तो पाठपुरावा वैयक्तिक स्तरावर सुनिश्चित करावा, असे स्पष्ट निर्देशही देण्यात आले.

विशेष न्यायालयाच्या स्थापनेसाठी आवश्यक प्रशासकीय, कायदेशीर आणि संस्थात्मक बाबींचा सविस्तर समावेश प्रकल्प अहवालात अपेक्षित आहे. त्याचबरोबर केंद्र शासनाच्या संबंधित मंत्रालयाशी समन्वय साधून प्रस्तावाला पुढे नेत या विशेष न्यायालयाची स्थापना करण्यात आली आहे.

अंमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांची प्रकरणे संवेदनशील आणि गंभीर स्वरूपाची असतात. अशा प्रकरणांची सुनावणी प्राधान्याने आणि कालबद्ध पद्धतीने झाल्यास न्यायप्रक्रिया अधिक परिणामकारक होण्यास मदत होईल. प्रस्तावित विशेष न्यायालयामुळे प्रलंबित प्रकरणांचा वेगाने निपटारा करणे, पुरावे आणि साक्षीदारांशी संबंधित प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे तसेच दोषींविरुद्ध प्रभावी न्यायालयीन कार्यवाही करणे सुलभ होणार आहे.

युवकांना अंमली पदार्थांच्या विळख्यातून सुरक्षित ठेवणे, अंमली पदार्थांच्या अवैध व्यवहाराला प्रतिबंध करणे आणि अशा गुन्ह्यांतील आरोपींविरुद्ध जलद व प्रभावी कारवाई सुनिश्चित करणे, या व्यापक उद्देशातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केला. विशेष न्यायालयाच्या स्थापनेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून केंद्र शासनाकडे पाठविण्याचे निर्देश हे त्याच प्रयत्नांचा महत्त्वाचा भाग आहे.

विशेष न्यायालयाची स्थापना झाल्यामुळे अंमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांविरोधातील राज्याच्या लढ्याला अधिक बळ मिळणार आहे. तसेच तपास यंत्रणा, अभियोजन यंत्रणा आणि न्यायालयीन प्रक्रिया यांच्यातील समन्वय अधिक सक्षम होऊन नागरिकांना वेगवान न्याय मिळण्यास मदत होईल. राज्यातील अंमली पदार्थविरोधी कारवाई अधिक परिणामकारक करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा पुढाकार महत्त्वपूर्ण ठरला आहे.

# मुलच्या कृषी महाविद्यालयासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांचा पाठपुरावा ठरला निर्णायक;

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील मूल येथील कृषी महाविद्यालयाच्या विकासासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला आता ठोस प्रशासकीय प्रतिसाद मिळाला असून, महाविद्यालयातील रिक्त पदांची याच महिन्यात पदभरती करण्याचे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी संबंधित विभागाला दिले आहेत. महाविद्यालयातील मनुष्यबळाची कमतरता, प्रलंबित विकासकामे आणि शैक्षणिक-संशोधनाशी निगडित प्रश्नांवर तातडीने कार्यवाही व्हावी, यासाठी आ. मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून मंत्रालयात कृषिमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत पदभरतीसह महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित विविध प्रश्नांवर सविस्तर आणि सकारात्मक चर्चा झाली.

या बैठकीस कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी मूल्य आयोगाचे सदस्य बंडू गौरकर तसेच कृषी विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मूलच्या कृषी महाविद्यालयातील आवश्यक पदे दीर्घकाळ रिक्त असल्यामुळे शैक्षणिक अध्यापन, प्रशासकीय कामकाज आणि संशोधनाच्या प्रक्रियेवर निर्माण होणाऱ्या अडचणींचा मुद्दा आ. सुधीर मुनगंटीवार यांनी बैठकीत ठामपणे मांडला. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे आणि महाविद्यालयाची संशोधनात्मक क्षमता अधिक बळकट व्हावी, यासाठी मनुष्यबळाची उपलब्धता अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाविद्यालयाची पदभरती याच महिन्यात करण्याची स्पष्ट मागणी आ. मुनगंटीवार यांनी केली. त्याची दखल घेत कृषिमंत्री दत्तात्रेय भरणे यांनी विभागाला तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. याचवेळी दीर्घकाळ सेवा बजावणाऱ्या कंत्राटी अधिकारी-कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न, महाविद्यालयाशी संबंधित वनजमिनीचा प्रलंबित प्रश्न आणि कृषी विद्यापीठाचा आकृतिबंध लागू करण्याचा मुद्दाही आ. मुनगंटीवार यांनी मांडला. या प्रश्नांवरही सकारात्मक मार्ग काढण्यासाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. त्यामुळे पदभरतीपुरता विषय मर्यादित न राहता महाविद्यालयाच्या संस्थात्मक बळकटीकरणाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे मुद्दे बैठकीत ऐरणीवर आले. त्या सर्व मुद्द्यावर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी संबंधितांना निर्देश दिले. एकार्जुना येथील भाजीपाला संशोधन केंद्रासाठी प्रलंबित असलेला निधी उपलब्ध करून देण्याचा मुद्दाही आ. मुनगंटीवार यांनी प्राधान्याने उपस्थित केला. भाजीपाला उत्पादनातील संशोधन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि त्याचा थेट लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी हे संशोधन केंद्र अधिक सक्षम करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.




## कॉकपिटचे स्थैर्य व सुरक्षा

ऐन दिवाळीच्या सुट्टीत एकदा विमानतळावर सुरक्षा चाचणीत सर्वजण रांगेत असताना एक महिला अत्यंत घाईगडबडीत सुरक्षा अधिकाऱ्यांकडे लवकर जाण्यासाठी विनवणी करू लागली. 'मला अत्यंत तातडी आहे आणि माझ्या विमानाची वेळ होत आली आहे,' असा घोशा तिने लावला. अधिकाऱ्यांनी मात्र जराही विचलित न होता तिला थांबवून ठेवले आणि थोडी अधिक काटेकोरपणे तिची तपासणी केली. त्यांचा संशय खरा निघाला. सुरक्षेचा उंबरठा पार करून ही महिला काही पुढे येऊ शकली नाही.

'फ्लायदुबई'च्या थरारक घटनेत मुंबईकर कॅप्टन स्मित मच्छार यांची धाडसी कामगिरी व प्रसंगावधान; तसेच अन्य प्रवासी आणि ऑफड्युटी वैमानिकाची योग्य वेळी मदत यांमुळे सर्वांचे प्राण वाचले खरे; परंतु हवाई सुरक्षेच्या बाबतीत सर्व शक्यतांचा विचार करून सावधगिरी गरजेची ठरते. हवाई वाहतुकीतील सुरक्षाप्रणालींमध्ये आजवर झालेल्या विविध घटनांनुसार बदल घडत आले. आंतरराष्ट्रीय नागरी हवाई वाहतूक संघटना (आयकाव) या शिखर संघटनेतर्फे जागतिक स्तरावरील विमान उड्डाण सुरक्षेतील नियमांवर मोहोर उमटविली जाते. १९६०-७०च्या दशकांत विमान अपहरणांचा धोका प्रथम समोर आला. त्यानंतर १९८५मध्ये एअर इंडियाच्या टोरोन्टो-मुंबई कनिष्क विमानात अज्ञात व्यक्तीने सूटकेसमधून बॉम्ब दडवून ठेवला होता. या घातपातानंतर बॉम्बशोधक व नाशक प्रकारच्या पद्धतींवर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले. मेटल डिटेक्टर, एक्स-रे तपासणी अशा सामग्रीचा तपासणीत समावेश झाला. सन २००६मध्ये रसायनांचा वापर करून विमान उडवण्याचा कट आखण्यात आला होता, तो उधळून लावण्यात आला.

दिनांक ११ सप्टेंबर २००१च्या अमेरिकेवरील हल्ल्यानंतर तर विमानाच्या कॉकपिटचे दरवाजे अभेद्य करण्यापासून विमानात काही मार्गांवर सशस्त्र एअर मार्शल तैनात करण्यापर्यंत विविध कठोर उपाय करण्यात आले. कंदहारची काठमांडू-दिल्ली इंडियन एअरलाइन्स विमान अपहरण घटना आणि ट्वीन टॉवर हल्ले यांच्यानंतर भारतातील ७२ विमानतळांवरील सुरक्षा यंत्रणा केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाच्या (सीआयएसएफ) हाती सोपविण्यात आली. मात्र, एकूणच सुरक्षा यंत्रणांकडे आणि सुरक्षाविषयक नियमांकडे पाहण्याचा कित्येक प्रवाशांचा दृष्टिकोन त्रासिक असतो. विमानात बॅगा ठेवण्यापासून ते मोबाइलचा उपयोग किंवा खिडक्यांची तावदाने उघडी ठेवण्याबाबतचे नियम पाळण्याविषयी कित्येक प्रवासी हलगर्जी दाखवितात. सध्याचे सुरक्षा वातावरण व भारतातील विमानवर्दळ पाहता प्रवाशांनीही सुरक्षा नियमांबाबत सहकार्याचा दृष्टिकोन बाळगायला हवा.

'फ्लायदुबई'च्या विमानातील घटनेनंतर काही नवी आव्हाने समोर आली आहेत. आजवरच्या घटनांनंतर सर्व लक्ष हे गणवेशधारी किंवा विमान कर्मचारी वगळून प्रवासी व अन्य आगंतुकांवर केंद्रित झाले होते. आता विमानाचे कॉकपिट हेच जर घातपाताचे केंद्र बनले, तर त्याला आळा कसा घालायचा, असा प्रश्न आ वासून उभा राहिला आहे. 'फ्लायदुबई' विमानातील घटनेत हल्लेखोर सहवैमानिकाने विमानातील आपत्कालीन सुटकेसाठी ठेवलेली कुऱ्हाड वापरल्याचे आता समोर येत आहे. आता प्रश्न तोच आहे, की या घटनेमुळे या कुऱ्हाडीला सोडचिठ्ठी काही देता येणार नाही. कदाचित तिची जागा बदलली, तरी ती कुणाच्याही हाती जाण्याचा धोका राहतोच. खरे तर दोन्ही वैमानिक जायबंदी झाल्यास काय करावे लागेल, याचा विचार 'आयकाव'च्या सुरक्षा नियमावलीतही केलेला असतो. त्यामुळेच एका सांकेतिक कोडने केबिन क्रूला दरवाजा उघडण्याची तरतूद केलेली असते. कॉकपिटमध्ये परिस्थिती हाताबाहेर गेली आहे, हे मात्र कळायला हवे. आता त्यासाठीच कॉकपिटला काही पारदर्शक काच वगैरे असावी का, यावरही कदाचित विचार होईल. वैमानिक, क्रू यांचे बॅकग्राउंड चेक अधिक काटेकोर करावे लागतील.

जगभरात अनेक कंपन्यांना वैमानिकांची चणचण भासत असते; त्यामुळेच वेगवेगळ्या देशांचे वैमानिक वेगवेगळ्या देशांतील विमान कंपन्यांची विमाने उडवतात. सध्या सुरू असलेले भूराजकीय संघर्ष व विविध देशांमधली साठमारी पाहता कुणाच्या मनात एखाद्या देशाविरुद्ध राग कधी उफाळून येईल, हे सांगणेही कठीण असते. त्यासाठी केलेल्या सुरक्षानिर्बंधांचा परिणाम विमान परिचालनावर किंवा वैमानिकभरतीवरही व्हायला नको. कामातील ताणतणाव, आर्थिक अस्थैर्य या वैयक्तिक बाबींचाही परिणाम कामावर व्हायला नको. त्यासाठी वैमानिक, केबिन क्रू यांचे प्रत्येक उड्डाणापूर्वी मानसिक संतुलन तपासणेही कठीण आहे. विमानांसाठी कॉकपिट आणि विमानाच्या केबिनचे मानसिक स्थैर्य महत्त्वाचे आहे व त्याच धर्तीवर इतर वाहनांसाठीही आता सुरक्षा यंत्रणांना हाच विचार करावा लागेल.

– समीर कर्वे

# भारताचा मानबिंदू : भारतीय वायुदल

दरवर्षी ८ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण देशात भारतीय वायुदल दिन म्हणून साजरा केला जातो. ८ ऑक्टोबर १९३२ रोजी भारतीय वायुदलाची स्थापना झाली. त्यामुळे २०२६ मध्ये भारतीय वायुदल आपला ९४ वा वायुदल दिन साजरा करत आहे. देशाच्या आकाशाचे रक्षण करण्याची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेणाऱ्या भारतीय वायुदलाच्या शौर्याला, पराक्रमाला आणि त्यागाला अभिवादन करण्याचा हा दिवस आहे.

भारतीय वायुदलाची सुरुवात अत्यंत मर्यादित साधनसामग्री आणि मोजक्या विमानांपासून झाली. मात्र स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतीय वायुदलाने सातत्याने आधुनिकीकरण केले. विविध देशांकडून अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्याबरोबरच आज भारत स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञान विकसित करण्याच्या दिशेनेही वेगाने वाटचाल करत आहे. तेजससारखे स्वदेशी लढाऊ विमान, सुखोई-३० एमकेआय, राफेल, मिराज-२००० यांसारखी अत्याधुनिक लढाऊ विमाने भारतीय वायुदलाच्या सामर्थ्यात भर घालत आहेत. आधुनिक रडार, क्षेपणास्त्र प्रणाली, हवाई इंधन भरण्याची क्षमता, उपग्रहाधारित दळणवळण, नेटवर्क-केंद्रित युद्धप्रणाली आणि ड्रोन तंत्रज्ञानामुळे वायुदलाची क्षमता दिवसेंदिवस वाढत आहे.

भारतीय वायुदलाच्या शौर्याचा इतिहास गौरवशाली आहे. १९४७-४८, १९६५ आणि १९७१च्या युद्धांमध्ये वायुदलाने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. विशेषतः १९७१च्या युद्धात भारतीय वायुदलाने प्रभावी हवाई कारवाया करत भारतीय सैन्याच्या प्रगतीला मोठी मदत केली. या पराक्रमामुळे भारतीय संरक्षण व्यवस्थेतील वायुदलाचे महत्त्व अधोरेखित झाले.

**कारगिल युद्धातील अतुलनीय पराक्रम !**

१९९९चे कारगिल युद्ध भारतीय वायुदलाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचे पर्व आहे. या युद्धात भारतीय वायुदलाने 'ऑपरेशन सफेद सागर' अंतर्गत महत्त्वाची हवाई कारवाई केली. अतिशय उंच आणि कठीण पर्वतीय प्रदेशात शत्रूच्या ठिकाणांवर अचूक हल्ले करणे हे मोठे आव्हान होते. प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती, उंच पर्वत आणि हवामान यांचा सामना करत भारतीय वायुदलाने शत्रूच्या तळांवर हवाई हल्ले करून भारतीय सैन्याच्या कारवाईला मोठे पाठबळ दिले. या मोहिमेने भारतीय वायुदलाच्या धैर्याबरोबरच त्याच्या अचूक नियोजनाची आणि युद्धकौशल्याची जगाला जाणीव करून दिली.

**बालाकोट एअर स्ट्राईक : दहशतवादाला चोख प्रत्युत्तर...**

पुलवामा दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने २६ फेब्रुवारी २०१९ रोजी बालाकोट येथे एअर स्ट्राईक केला. भारतीय वायुदलाच्या मिराज-२००० विमानांनी पाकिस्तानातील बालाकोट परिसरातील दहशतवादी प्रशिक्षण तळांवर हवाई कारवाई केली. या कारवाईने दहशतवादाला भारताचे धोरणात्मक आणि लष्करी प्रत्युत्तर देण्याचे सामर्थ्य जगासमोर दाखवून दिले. या एअर स्ट्राईकमुळे भारतीय वायुदलाची अचूक हवाई हल्ला करण्याची क्षमता पुन्हा एकदा चर्चेत आली.

**ऑपरेशन सिंदूर : नव्या युगातील हवाई सामर्थ्य**

ऑपरेशन सिंदूरने भारतीय वायुदलाच्या आधुनिक युद्धक्षमता आणि संयुक्त लष्करी कारवाईतील महत्त्व अधोरेखित केले. दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देताना भारतीय सशस्त्र दलांनी लक्ष्यित आणि समन्वित कारवाई केली. या कारवाईत भारतीय वायुदलाने आधुनिक लढाऊ विमाने, अचूक शस्त्रप्रणाली आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपली क्षमता दाखवून दिली. शत्रूच्या संभाव्य हवाई धोक्यांचा सामना करण्यासाठी रडार, हवाई संरक्षण प्रणाली, गुप्तचर माहिती आणि नेटवर्क-केंद्रित युद्धतंत्र यांचे महत्त्वही या कारवाईत प्रकर्षाने समोर आले.

भारतीय वायुदलाची ताकद केवळ लढाऊ विमानांमध्ये नाही. वैमानिक, तंत्रज्ञ, अभियंते, हवाई वाहतूक नियंत्रक, वैद्यकीय पथके आणि जमिनीवर अहोरात्र काम करणारे हजारो कर्मचारी हे त्याचे खरे सामर्थ्य आहेत. विमान आकाशात झेपावण्यापूर्वी त्यामागे असंख्य हातांचे कष्ट असतात. देशाच्या सुरक्षेसाठी हे सर्व जण आपले



कर्तव्य अत्यंत निष्ठेने पार पाडतात.

भारतीय वायुदलाचे कार्य केवळ युद्धापुरते मर्यादित नाही. पूर, भूकंप, चक्रीवादळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींच्या काळात बचावकार्य, अन्न व औषधांची वाहतूक, दुर्गम भागात मदत पोहोचविणे आणि नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविणे अशा मानवतावादी कार्यातही वायुदल नेहमीच आघाडीवर राहिले आहे.

आजच्या काळात युद्धाचे स्वरूप वेगाने बदलत आहे. पारंपरिक लढाऊ विमानांबरोबरच ड्रोन, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर युद्ध, इलेक्ट्रॉनिक युद्ध, उपग्रह तंत्रज्ञान आणि मानवरहित युद्धप्रणाली यांचे महत्त्व वाढत आहे. त्यामुळे भारतीय वायुदलाला भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी सातत्याने आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारावे लागणार आहे. त्याचबरोबर स्वदेशी संरक्षण उत्पादनाला अधिक चालना देणेही गरजेचे आहे.

भारतीय वायुदल हा केवळ संरक्षण दलाचा एक भाग नाही, तर तो भारताच्या सामर्थ्याचा, आत्मविश्वासाचा आणि राष्ट्राभिमानाचा मानबिंदू आहे. देशाच्या आकाशात तिरंगा अभिमानाने फडकत राहावा, भारताच्या सीमांकडे वाकड्या नजरेने पाहण्याचे धाडस कोणालाही होऊ नये आणि देशातील नागरिक सुरक्षित राहावेत यासाठी भारतीय वायुदलाचे वीर सदैव सज्ज असतात.

कारगिलच्या बर्फाच्छादित पर्वतांपासून बालाकोटपर्यंत आणि ऑपरेशन सिंदूरपर्यंत भारतीय वायुदलाने वेळोवेळी आपल्या पराक्रमाची प्रचिती दिली आहे. या शूर जवानांच्या धैर्यामुळेच देशवासीयांचा भारतीय वायुदलावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

**आकाशाची उंची गाठणाऱ्या आपल्या वीरांना सलाम!**
**भारताच्या नभांगणाचे रक्षण करणाऱ्या**
**भारतीय वायुदलाला मनःपूर्वक अभिवादन!**

**भारतीय वायुदल दिनाच्या सर्व भारतीयांना हार्दिक शुभेच्छा!**

**- श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**

# रुग्णालयातील आगीच्या घटना चिंताजनक

मुलगा झाला ही आनंदाची वार्ता सर्व नातेवाईकांना फोनवरून सांगणाऱ्या स्वप्नील बर्गे या पित्याचा आणि त्या निष्पाप किंतू अगदीच अल्पायुषी ठरलेल्या मुलाला जन्म देणाऱ्या मातेचा आनंद क्षणातच शोक सागरात बुडावा अशी दुर्दैवी घटना २४ ऑगस्टच्या पहाटे अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात घडली.

२४ ऑगस्ट २०२६ च्या पहाटे अगदी तीन ते साडे तीनच्या दरम्यान डफरिन रुग्णालयातील नवजात शिशू कक्षाच्या आऊटबॉर्न विभागात अचानक आग लागली. एका माहितीनुसार त्यावेळी तिथे तब्बल ३९ नवजात बालके भरती होती. आऊटबॉर्न युनिटमधील व्हेंटिलेटरमध्ये अचानक स्फोट होऊन आग लागली. मात्र, या दुर्घटनेत कर्तव्यावर हजर असलेल्या ललिता कासदेकर या परिचारिकेसह इतरांनी जीवाची बाजी लावत त्यातील ३६ नवजात बाळांना मृत्यूच्या दाढेतून खेचून बाहेर काढले. मात्र, दुर्दैव असे की झालेला काळोख आणि गुदमरून टाकणारा धूर यामुळे तीन बालकांना कुणीच वाचवू शकले नाही. रुग्णालयाचा सर्व परिसर किंकाळ्यानी भरून निघावा अशी ती काळरात्र विसरणे कठीणच. याहून कठीण मृत झालेल्या बालकांच्या पालकांचा टाहो.

या प्रकरणाची चौकशीअंती, रुग्णालयातील देखभालीची जबाबदारी असलेल्या 'मेसर्स एओव्ही इंटरनॅशनल एलएलपी ' या कंपनीच्या कामात दोष आणि हलगर्जीपणा आढळून आल्याचे म्हटले आहे. तसेच वैद्यकीय उपकरणे पुरविणाऱ्या शिलर कंपनीच्या सेवांमध्येही दोष आढळून आले आहेत. यातील दोषींना काळया यादीत टाकण्याचे प्रशासनाला निर्देश देण्यात आले आहेत. तसेच या प्रकरणी रुग्णालयाचे आरोग्य उपसंचालक, सीएससह इतर पाच जणांना निलंबित करण्यात आल्याचे वृत्त होते. तीन मुलांच्या होरपळून मृत्यू प्रकरणी कारवाई होणार यात दुमत नाही. मात्र, अशा घटना देशात वारंवार घडत असल्याने यावर गांभीर्याने विचार करणे आणि रुग्णालयांचे वारंवार योग्य प्रकारे फायर ऑडिट होणे गरजेचे आहे.



रुग्णालयात घडणाऱ्या अशा आगीच्या घटना खरेच चिंताजनक आहेत.

मागे ९ जानेवारी २०२१ रोजी भंडारा येथील एका रुग्णालयात लागलेल्या आगीत अशीच दहा निष्पाप जीव होरपळले होते. त्याची शाई वाळत नाही तर, अमरावतीची ही घटना जीव हेलावून सोडणारी आहे. ज्या बालकांनी या सृष्टीचा आनंद घेण्यासाठी नुकतेच पाऊल टाकावे आणि काळाने असा घाला घालावा हे शल्य हृदयाला बोचणारे आहे. विशेष म्हणजे अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या जुन्या इमारतीत सुद्धा तीन वर्षांपूर्वी नवजात शिशू अतिदक्षता विभागात लागलेल्या भीषण आगीत एका बालकाचा होरपळून मृत्यू झाला होता. तरी या घटनेनंतर रुग्णालय प्रशासनाला जाग न यावी म्हणजे नवलच.

देशात अन्य एका घटनेत तामिळनाडू येथील रामनाथपुरम जिल्ह्यातील ऐरवडी येथील एका अनधिकृत मनोरुग्णालयात ६ ऑगस्ट २००१ रोजी लागलेल्या भीषण आगीत सुद्धा २८ जण जिवंत जळाले होते. देशात २००१ ते २०२६ या कालावधीत कोलकाता, भुवनेश्वर, मुर्शिदाबाद, मुंबई, भरूच, अहिल्यानगर, नवी दिल्ली, झाशी, जयपूर, छिंदवाडा अशा कित्येक शहरांतील रुग्णालयात आगीच्या लहान मोठ्या दुर्घटना घडून कितीतरी जीवांचा कोळसा झाला आहे. कितीतरी निष्पाप जीव उमलण्या आधीच भरडले गेले आहेत. त्यात कित्येक नवजात बालिकांचा सुद्धा समावेश आहे.

छत्रपती संभाजी नगर मधील एका रुग्णालयात सप्टेंबर २०२६ मध्ये पहाटे आग लागली. त्या वेळी ५८ रुग्ण आणि ९ लहान बाळे उपचारासाठी दाखल होती. सुदैवाने, सर्वांना तातडीने सुरक्षित बाहेर काढण्यात आल्याने मोठी जीवितहानी टळली होती. मात्र, प्रत्येक बालकांचे असे सुदैव नव्हते.

देशात आरोग्य मंदिर असलेल्या रुग्णालयांत अशा आगीच्या वारंवार घटना घडत असतील तर यावर प्रशासनाने कंबर कसून योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे. तेथील उपकरणांची गुणवत्ता तपासणे, फायर ऑडिट करणे तसेच अशा घटना प्रसंगी बाहेर पडायचे मार्ग या सर्व गोष्टींची तपासणी आणि त्यावर अंमलबजावणी गरजेची आहे.

**– लीलाधर दवंडे**
**कामठी (नागपूर)**
**८४१२८७७२२०**

## मगरमिठी

आपत्ती मागे आपत्ती
संकटाची मगर मिठी
हतबल हो माणूसकी
धडाधडा बा ऊर पिटी

आवरा रे नेत्यांचादौरा
थांबवाव्या गाठी भेटी
सावरु द्या संकटग्रस्तां
नकाधरु बा असे वेठी

देखावाचाले मदतींचा
घेऊन येता लहानपेटी
पिशव्यांवर नावफोटो
अडकवली छान पाटी

शब्द फुटेना प्रश्न कैक
मुलाखत उपाशीपोटी
कॅमे-यांने दिपले डोळे
टिपलेपोटे गेलेखपाटी

कोरडीचं भाषणबाजी
तुम्ही भरवली चौपाटी
सोबतमिडिया कशास
वृत्ती विचित्र उरफाटी

विरोधक नि सत्ताधारी
आपसांतली लठ्ठालठ्ठी
आला जर मदतीसाठी
पुरे कराव्या झट्टा पट्टी

दोषारोप फैरीझडल्या
मदतकार्या आडकाठी
भले काही दिले नाही
कपाळावर नकोआठी

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# श्री नरेंद्र मोदींची रौप्यमहोत्सवी यशस्वी कारकीर्द

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरात राज्याची मुख्यमंत्री पदाची सूत्रे दिनांक ७ ऑक्टोबर २००१ रोजी हाती घेतली व दिनांक २६ मे २०१४ रोजी त्यांनी भारताचे पंतप्रधान म्हणून सूत्रे हाती घेतली. या त्यांच्या रौप्यमहोत्सवी कारकिर्दीत भारताने अनेक प्रगतीची शिखरे पादाक्रांत केली. आज जगात भारताची प्रतिष्ठा व मान मोठा आहे .मोदी याना जगभरातील अनेक देशांनी सर्वोच्च पुरस्काराने गौरविले आहे. अशा पुरस्काराची संख्या ३६ एवढी पोहचली आहे. या २५ वर्षाच्या कारकिर्दीचा आढावा घ्यावयाचा असल्यास अनेक गोष्टी समोर येतात. आज देशातील २५ कोटी नागरिकांना मोदी यांनी गरीब स्थितीतून बाहेर काढले आहे. या कारकीदीत भारताच्या संरक्षण उत्पादनाची विक्रमी निर्यात पोहचली आहे. जन धन योजना , यु पीआय ची निर्मिती, स्टार्ट अप मधून युवा वर्गाला संधी, गरिबांसाठी व कमी उत्पन्न गटासाठी घरे, स्वच्छ भारत योजना, प्रत्येकघरानळतसेच शौचालय, काश्मीरला ३७० कलाम रद्द करणे, राम मंदिराची निर्मिती, तीन तलाख सारखी प्रथा रद्द करणे आदी बाबींचा समावेश आहे पक्षीय पातळीवर देखील त्यांनी मोठे काम केले आहे. आज भारतीय जनता पार्टी हा पक्ष जगात सर्वात मोठा पक्ष आहे . २००१ मध्ये गुजरात ची निर्यात केवळ एक लाख कोटी पेक्षा कमी होती आज ती निर्यात तब्बल चार लाख कोटी पर्यन्त पोहचली आहे. देशातील २२ राज्यात बीजेपी किन्वा त्यांच्या मित्र पक्षाची सरकारे आहेत . करोना काळापासून देशातील ८० कोटी हुन अधिक लोकांना मोफत अन्न धान्य देण्याची योजना मोदी यांनी सुरु केली आहे. मोदींच्या कारकिर्दीत २००१ साली गुजरात राज्यात मोठा भूकंप झाला . त्यावेळी त्यांनी केलेले कार्य वाखाणण्याजोगे आहे . शेजारी देशांनी कुरापती काढल्यानंतर त्यांना ऑपरेशन सिंदूर दाखवून मोठे यश मिळविले. जीएसटी सारख्या योजनेनी देशात कर पद्धतीत सुधारणा घडवून आणली अशा अनेक योजनांद्वारे मोदीनी भारताला मोठे केले आहे. आज देशातील चौथी मोठी अर्थव्यवस्था म्हणून भारताला नजीकच्या काळात जगाच्या नकाशावर आणले जाणार आहे. अशा मोदींच्या रौप्यमहोत्सवी कारकिर्दीला सलाम. **अशीच प्रगती मोदींच्या हातून घडो हीच सदिच्छा...**

**- शांताराम वाघ पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# डॉ.निलेश राणे यांची एकाच वेळी २ राष्ट्रीय विक्रम बुकमध्ये नोंद



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, मुंबई :** राज्यातील युवा प्रेरणास्रोत डॉ. निलेश राणे यांच्या सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे. त्यांच्या कार्याची रिपब्लिक बुक ऑफ रेकॉर्ड आणि इनक्रेडिबल इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड या दोन राष्ट्रीय विक्रम बुकमध्ये एकाचवेळी नोंद करण्यात आली आहे.

गेल्या ९ वर्षांपासून ग्रामीण तसेच दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांतील ४,००० हून अधिक खेळाडूंना विविध क्रीडा प्रकारांमध्ये मार्गदर्शन करून त्यांना क्रीडा क्षेत्रात योग्य दिशा देण्याचे कार्य डॉ.राणे यांनी केले आहे.

या सातत्यपूर्ण कार्याची दखल भारतासह इंग्लंड आणि अमेरिका येथील संबंधित संस्थांकडून घेण्यात आल्याचे सांगण्यात आले असून, त्यांच्या कार्याची विविध विक्रम नोंद आणि सन्मान करण्यात आला आहे.

सामाजिक बांधिलकी आणि क्रीडा क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदानाची दोन राष्ट्रीय विक्रम बुकमध्ये एकाचवेळी झालेली नोंद ही डॉ.निलेश राणे यांच्या कार्याची विशेष दखल मानली जात आहे.

# तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेत, विलासराव देशमुख उर्दू शाळेचे वर्चस्व कायम



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०७, जिंतूर (परभणी) :** तालुका क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेत विलासराव देशमुख उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेने आपल्या यशाची परंपरा कायम राखत यंदाही दैदिप्यमान कामगिरी केली. १७ वर्षांखालील आणि १९ वर्षांखालील अशा दोन्ही वयोगटांत विजेतेपद पटकावत शाळेने जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेसाठी आपली जागा निश्चित केली आहे.१७ वर्षांखालील गटाच्या अंतिम सामन्यात विलासराव देशमुख उर्दू शाळेच्या संघाने जवाहर विद्यालय, जिंतूर संघाचा पराभव करत प्रथम क्रमांक पटकावला. तर १९ वर्षांखालील गटाच्या अंतिम सामन्यात अडगाव संघावर मात करत विजेतेपद मिळविले. विशेष म्हणजे, सलग चौथ्या वर्षी तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेत शाळेने आपले वर्चस्व कायम ठेवले आहे.१७ वर्षांखालील गटात इयत्ता दहावीचा विद्यार्थी उमर अबूबकर चाऊस याची उत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. तसेच १९ वर्षांखालील गटाच्या अंतिम सामन्यात बारावी कला शाखेचा विद्यार्थी अयान खान अयाज खान याने दमदार कामगिरी करत उत्कृष्ट खेळाडूचा बहुमान पटकावला.

या यशामागे शाळेच्या क्रीडा विभागाचे प्रमुख मेराजोद्दीन सिद्दीकी सर तसेच त्यांचे सहाय्यक सोहेल खान सर यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेचे मुख्याध्यापक अहमद सिद्दीकी सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण सराव व मेहनतीच्या जोरावर हे उल्लेखनीय यश संपादन केले.

या दैदिप्यमान कामगिरीबद्दल शाळेचे अध्यक्ष काजी आसेफोद्दीन सिद्दीकी साहेब, उपाध्यक्ष काजी वासेफोद्दीन सिद्दीकी साहेब, तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले. जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# शेतकऱ्याच्या शेतात सोयाबीन पिकाचा प्रात्यक्षिक प्रयोग; सरासरी उत्पादनाचे मूल्यांकन...




**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.०७, उदगीर (लातूर) :** उदगीर तालुक्यातील मौजे लोणी येथे आज महसूल विभाग व कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने पीक कापणी प्रयोग घेण्यात आला.

शेतकरी गणपत चोले यांच्या शेतातील सोयाबीन पिकावर हा प्रयोग करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद सदस्य यमुनाजी भुजबळे. पंचायत समिती विस्तार अधिकारी अजने साहेब. कृषी सहाय्यक,तोलसरवाड साहेब तसेच गावातील शेतकरी व पोलीस पाटील यांच्या उपस्थितीत १० * १० मीटर क्षेत्रातील पीक कापणी करून त्याचे वजन व उत्पादन मोजण्यात आले.

या प्रयोगातून मिळालेल्या उत्पादनाच्या आधारे गावातील सरासरी पीक उत्पादन निश्चित केले जाणार असून, पीक विमा व नुकसान भरपाईसाठी हा अहवाल म हत्त्वाचा ठरणार आहे. यावेळी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृषी विभागाने शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

# मोबाईल का मामला, रॉडचा हमला; येरवड्यात दहशतीचा जलवा!

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.०७, येरवडा (लक्ष्मीनगर) :** येरवड्यातील रामनगर परिसरातील गेहलोत चौकात ६ ऑक्टोबर रोजी पहाटे सव्वासहा वाजण्याच्या सुमारास 'भाईगिरी'ची एक अत्यंत धक्कादायक घटना घडली.

जय जवाननगर येथे राहणारे ४३ वर्षीय पेंटर संदीप आनंद सोनवणे हे कामावर जात असताना, त्यांचा परिचित आरोपी अमन आनंद गेहलोत याने त्यांना भररस्त्यात अडवले. आरोपीने सोनवणे यांच्यावर मोबाईल चोरीचा आक्षेप घेत, मेरा मोबाईल किधर है, तु ही चुराके भागाना साले असे म्हणून शिवीगाळ केली आणि मेरा मोबाईल मेरेको दे, नही तो आज तुझे उपर भेज दूंगा अशी जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर आरोपीने लोखंडी रॉडने सोनवणे यांच्या डोक्यात, खांद्यावर आणि दोन्ही हातांवर गंभीर वार केले. नागरिकांनी वाचवण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने रॉड हवेत फिरवून मै इधरका भाई हू, कोई साला बिच मे आया तो उसेभी उपर भेज दूंगा अशी धमकी देऊन परिसरात दहशत पसरवली. याप्रकरणी लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



गुन्हा घडल्यानंतर आरोपी फरार झाला होता. दरम्यान, लक्ष्मीनगर पोलीस ठाण्याचे पो. शि.राहुल परदेशी आणि पो.ह. गणेश लोखंडे यांना गुप्त बातमीदाराकडून आरोपीबाबत अत्यंत गोपनीय बातमी मिळाली. या बातमीच्या आधारे पोलिसांनी तातडीने जाळे रचून आरोपी अमन आनंद गेहलोत याला शिताफीने अटक केली. या दरम्यान लक्ष्मी नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज नांद्रे, पोलीस निरीक्षक अमर कदम (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनानुसार पुढील तपास स.पो.नि. दत्तात्रय लिंगाडे करत आहेत.

# सुप्यातील देवीची पालखी परंपरा अखंड; नवरात्रापूर्वीच भक्तिमय वातावरण

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०७, सुपा (अहिल्यानगर) :** ऐतिहासिक आणि धार्मिक परंपरेची साक्ष देणाऱ्या सुपा गावातील देवीच्या पालखी सोहळ्याला यंदाही भक्तिभावाचे वातावरण लाभले आहे. नवरात्रोत्सवाच्या पूर्वसंध्येला राहुरीहून निघालेली देवीची पालखी जामगाव मार्गे सुप्यात दाखल होण्याची परंपरा आजही अखंडपणे सुरू आहे.

या देवीच्या नावाने इनामी जमीन असून, त्या जमिनीत बोरीच्या झाडांची लागवड केली जाते. देवीच्या पालखीसाठी याच बोरीच्या लाकडाचा वापर करण्याची प्राचीन परंपरा असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे या सोहळ्याला केवळ धार्मिक श्रद्धाच नाही, तर ऐतिहासिक वारशाचीही जोड आहे.




**पालखीचा प्रवास आणि मानकरी**

परंपरेनुसार भाद्रपद पौर्णिमेला राहुरी येथून पालखीचा प्रवास सुरू होतो. तेथून ती जामगाव येथे येते. संस्थानिक महादजी शिंदे आणि सुप्याचे शाबूसिंग पवार यांनी ही पालखी दर्शनाची परंपरा सुरू केल्याचे जुन्या जाणत्यांकडून सांगितले जाते.

जामगाव येथील शिंदे वाड्यात तसेच कै. पंढरीनाथ पाटील यांच्या वाड्यात पालखीच्या आरतीचा मान असतो. त्यानंतर पालखी सुप्याकडे मार्गस्थ होते.

सुप्याचे राजे पुंडकेश्री यांचे वंशज संग्रामसिंह पवार व जगदेव पवार यांना सुप्यात पालखीच्या आरतीचा मान परंपरेने आहे. पालखीच्या दर्शनासाठी सुपा परिसरातील सुमारे २५ गावांमधून भाविक मोठ्या संख्येने गर्दी करतात. दिवसभर दर्शनानंतर सायंकाळी शहाजणपूरच्या ग्रामस्थांकडून पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात येते.

**सुप्याची ओळखच पालखीशी जोडलेली...**

सुपा हे गाव यादवकालापासून 'सुपेकाडी' म्हणून परिचित असल्याचे ऐतिहासिक संदर्भ सांगतात. त्याच काळापासून ही पालखी परंपरा सुरू असल्याचे मानले जाते. पुढे शाबूसिंग पवार राजांनी सुपे गावाला वेगळी ओळख मिळवून दिली. त्यामुळे सुप्याची ऐतिहासिक ओळख, पवार घराण्याची परंपरा आणि देवीचा पालखी सोहळा यांचे अतूट नाते निर्माण झाले आहे.

दरम्यान, पूर्वी पालखी आणण्यासाठी वापरला जाणारा पारंपरिक मार्ग आता बदलल्याने स्थानिकांमध्ये चर्चा सुरू आहे. हा पालखी सोहळा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून सुपा परिसराच्या इतिहास, श्रद्धा आणि संस्कृतीचे प्रतीक असल्याने, पारंपरिक मार्ग आणि या परंपरेशी निगडित ऐतिहासिक ठिकाणांचे संवर्धन करावे, अशी मागणी भाविकांमधून होत आहे.

# खापरखेडा नगरपरिषदेचा निर्णय होईपर्यंत चनकापूर ग्रामपंचायत निवडणूक गोठवा

## नगरविकास मंत्रालयाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह ? उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवहेलना...

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०७, नागपूर :** चिचोली-भानेगाव-चनकापूर या तीन ग्राम पंचायतींचे विलीनीकरण करून संयुक्त खापरखेडा नगरपरिषद स्थापन करण्याच्या प्रकरणावरून खापरखेडा परिसरात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. नगरविकास मंत्रालयाने संयुक्त खापरखेडा नगरपरिषद प्रस्तावावर ठोस निर्णय घेतला नाही, उलट उच्च न्यायालयाच्या आदेशाला केराची टोपली दाखवल्याचा आरोप होत आहे. यादरम्यान सरपंच पदाचे आरक्षण जाहीर झाल्याने डिसेंबर २०२६ अखेरीस चनकापूर ग्रामपंचायतीची निवडणूक लागण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे नगरपरिषदेबाबत अंतिम निर्णय होईपर्यंत चनकापूर ग्राम पंचायत निवडणूक प्रक्रिया तातडीने गोठवण्याची मागणी स्थानिक जनतेतून पुढे येत आहे.




वलनी जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत येणाऱ्या चनकापूर ग्रामपंचायतीचा कार्यकाळ फेब्रुवारी २०२६ मध्येच संपला आहे, तर चिंचोली आणि भानेगाव ग्रामपंचायतचा कार्यकाळ डिसेंबर २०२७ रोजी संपणार आहे. खापरखेडा परिसराचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीकोनातून संयुक्त खापरखेडा नगरपरिषद स्थापनेचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत ५ मे २०२५ रोजी नगरविकास मंत्रालयाकडे पाठवण्यात आला होता. मात्र, नगरविकास मंत्रालयात नगरपरिषद प्रस्ताव अडकला.

यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते विलास महल्ले यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाने ८ ऑक्टोबर २०२५ रोजी स्पष्ट आदेश देत नगरविकास मंत्रालयाला विलास महल्ले यांच्या निवेदनावर आठ आठवड्यांच्या आत अंतिम निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते.

न्यायालयाची मुदत संपली अनेक महिने उलटले तरीही नगरविकास मंत्रालयाने संयुक्त खापरखेडा नगरपरिषद बाबत कोणतीही अधिसूचना जारी केलेली नाही, उलट न्यायालयाच्या आदेशाची नगरविकास मंत्रालयाने अवहेलना केली आहे.

८ सप्टेंबर २०२६ रोजी सरपंच पदांचे आरक्षण जाहीर होताच चनकापूर परिसरात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. अनेक कार्यकर्ते व स्थानिक राजकीय नेते गुडघ्याला बाशिंग बांधून उभे आहेत. शिवाय संभाव्य सरपंच पदाच्या उमेदवारांनी सोशल मीडियावर हेवेदावे सुरू आहेत. आतापासूनच पैशाचा खेळ सुरू झाला असून लाखो रुपयांची उधळपट्टी होणार आहे त्यामुळे ग्रामपंचायत निवडणूका पूर्वी संयुक्त खापरखेडा नगरपरिषदेचा निर्णय होने अपेक्षित आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशाचा मान ठेऊन नगरविकास मंत्रालयाने खापरखेडा नगरपरिषदेचा प्रश्न तातडीने निकाली काढावा तोपर्यंत चनकापूर ग्रामपंचायत निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे स्थगित ठेवावी असा आक्रमक पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहे.

# शालेय राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेसाठी सरस्वती शाळेच्या साहस भोजेची निवड

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०७, घाटकोपर :** जिल्हा क्रीडा अधिकारी, पालघर व वसई-विरार म हानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १ व २ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या शालेय विभागीय तायक्कांदो स्पर्धेत घाटकोपर भटवाडी येथील सरस्वती विद्या मंदिर (सेकंडरी इंग्लिश मिडियम) शाळेच्या विद्यार्थ्याने घवघवीत यश संपादन केले आहे. या शाळेचा इयत्ता १० वी मध्ये शिकणारा खेळाडू साहस भोजे याने या विभागीय स्पर्धेत दमदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले आहे. या सुवर्ण कामगिरीमुळे त्याची शालेय राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सरस्वती विद्या मंदिर, भटवाडी या शाळेची क्रीडा क्षेत्रातील परंपरा उज्ज्वल असून याआधीही या शाळेतील अनेक खेळाडूंनी राज्य व राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके मिळवून शाळेचा नावलौकिक वाढवला आहे. साहसच्या या यशात त्याची भर पडली आहे.



साहस भोजे याच्या या यशाबद्दल शाळेच्या संचालिका दिपाली पवार, मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक वर्गाकडून त्याचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

दरम्यान, अकोला येथे दिनांक ७ ते ९ ऑक्टोबर २०२६ दरम्यान होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेत तो सहभागी होणार असून त्याला स्पर्धे साठी विशेष शुभेच्छा देण्यात आल्या आहे.

# लोकशाही मजबूत करा, दडपशाही नव्हे!

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०७, मिरा भाईंदर :** दिल्लीमध्ये आंदोलन करणाऱ्या युवक-युवतींवर पोलिसांकडून झालेल्या कथित गैरवर्तनाच्या घटना अत्यंत गंभीर प्रश्न उपस्थित करतात. कायदा व सुव्यवस्था राखणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे; मात्र आंदोलनकर्त्यांशी कायदेशीर मर्यादा, मानवी प्रतिष्ठा आणि आवश्यकतेच्या तत्त्वांचे पालन करूनच वर्तन झाले पाहिजे. विशेषतः महिला आंदोलनकर्त्यांशी कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन किंवा शारीरिक छेडछाड झाल्याचा आरोप असेल, तर त्याची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.पोलिसांना नागरिकांच्या करातून वेतन मिळते. त्यामुळे पोलीस दल हे नागरिकांच्या संरक्षणासाठी आणि कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आहे. पोलिसांनी कोणत्याही राजकीय दबावापासून स्वतंत्रपणे आणि संविधानिक मूल्यांनुसार काम करणे अपेक्षित आहे.

आंदोलन हा लोकशाही व्यवस्थेतील नागरिकांचा महत्त्वाचा अधिकार आहे. सरकारच्या धोरणांविरोधात किंवा अन्यायाविरोधात नागरिक शांततामय मार्गाने आवाज उठवू शकतात. त्याच वेळी आंदोलनकर्त्यांनीही कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पाळली पाहिजे. सरकार आणि प्रशासनाने आंदोलनाला केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न न मानता त्यामागील नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेण्याची प्रक्रिया मजबूत केली पाहिजे.

**पोलिसांची ओळख स्पष्ट असावी**

प्रत्येक पोलिस कर्मचाऱ्याने कर्तव्य बजावताना स्पष्ट नावाची बॅच आणि नियमानुसार गणवेश धारण करणे महत्त्वाचे आहे. विशेष परिस्थितीत साध्या वेशातील पोलिस तैनात असतील, तर त्यांची अधिकृत ओळख आणि जबाबदारी स्पष्ट राहण्यासाठी आवश्यक व्यवस्था असली पाहिजे. नागरिकांना कारवाई करणाऱ्या व्यक्तीची अधिकृत ओळख समजणे हा पारदर्शकतेचा महत्त्वाचा भाग आहे.

**सत्तेचे उद्दिष्ट सुशासन असावे**

सत्ता ही नागरिकांच्या सेवेसाठी असते. सरकार कोणत्याही पक्षाचे असो, नागरिकांच्या प्रश्नांना उत्तर देणे, प्रशासन पारदर्शक ठेवणे आणि संविधानिक संस्थांवरील विश्वास कायम ठेवणे ही लोकशाहीची मूलभूत जबाबदारी आहे.

निवडणूक प्रक्रियेबाबत नागरिकांच्या मनात कोणतीही शंका निर्माण होत असेल, तर त्या शंकांचे स्पष्टीकरण पारदर्शक पद्धतीने झाले पाहिजे. मतदार यादी, ऋॲ ६ आणि निवडणूक प्रक्रियेतील नियमांबाबत करण्यात येणारे आरोप व दावे हे अधिकृत कागदपत्रे आणि निवडणूक आयोगाच्या स्पष्टीकरणाच्या आधारे तपासले गेले पाहिजेत.

लोकशाहीमध्ये सत्तांतराची शक्यता हीच लोकशाहीची ताकद आहे. कोणत्याही पक्षाला किंवा सरकारला कायमस्वरूपी सत्तेचा अधिकार नसतो. नागरिकांचा विश्वास, पारदर्शक निवडणूक प्रक्रिया, स्वतंत्र संस्था आणि संविधानिक अधिकार यांचे संरक्षण झाले तरच लोकशाही अधिक मजबूत होईल.

**सत्तेची गुर्मी नव्हे, संविधानाची मर्यादा महत्त्वाची आहे.**
**दडपशाही नव्हे, संवाद आवश्यक आहे.**
**लोकशाही कमजोर नव्हेअधिक मजबूत झाली पाहिजे!**

---

## श्रीक्षेत्र (खेडे) येथे ११ आक्टोबर पासून श्री हिंगलाज देवी माता नवरात्र महोत्सवास प्रारंभ

### १४ ऑक्टोबर रोजी हिंगलाज देवी माता भव्य नवरात्र यात्रा महोत्सव

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०७, विंचूर (नाशिक) :** अठरापगड समाजाची निफाड तालुक्यातील कुलदेवता असलेल्या श्रीक्षेत्र खेडे हिंगलाजमाता नगर तालुका निफाड येथे श्री हिंगलाज देवी माता विश्वस्त व समस्त ग्रामस्थ खेडे हिंगलाज नगर आयोजित हिंगलाज देवी माता मंदिर येथे अश्विन नवरात्र महोत्सवास रविवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०२६ पासून मोठ्या उत्साहात भक्तीने वातावरणात प्रारंभ होणार आहे अशी माहिती श्री हिंगलाज देवी माता विश्वस्त समस्त ग्राम स्थ व भजनी मंडळ खेडे हिंगलाज नगर यांनी दिली आहे.




◆ **दैनंदिन कार्यक्रम याप्रमाणे**

दररोज सकाळी ६.३० वाजता देवी मातेची महापूजा.

सकाळी ८ ते १० व दुपारी ३ ते ५ दुर्गा सप्तशती पाठ पठण,

सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ

सायंकाळी ६.४५ वाजता महाआरती

रात्री ९ ते ११ हरी कीर्तनाचे कार्यक्रम.

◆ **कीर्तनाची रुपरेषा पुढील प्रमाणे :-**

रविवार ११ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ९ ते ११ हभप गोरख महाराज काळे अंगणगाव.

सोमवार १२ ऑक्टोबर रात्री ९ ते ११ ह भ प राहुल महाराज खालकर , भेंडाळी.

मंगळवार १३ ऑक्टोबर रात्री ९ ते ११ ह भ प योगेश महाराज गायकवाड कोळवाडी, निफाड

बुधवार १४ ऑक्टोबर रोजी हिंगलाज देवी माता भव्ययात्रा महोत्सव.

गुरुवार १५ ऑक्टोबर रात्री ९ ते११ ह भ प अनिल महाराज दातार ,कोठुरे.

शुक्रवार १६ ऑक्टोबर रात्री ९ ते ११ ह भ प किशोर महाराज खरात, सिन्नर.

शनिवार १७ ऑक्टोबर रात्री ९ ते ११ ज्ञानेश्वरी कंठस्थ युवा कीर्तनकार हभप ऋषिकेश महाराज चव्हाण, ठाणगावकर, येवला

रविवार १८ ऑक्टोबर रात्री नऊ ते ११ धर्माचार्य ह भ प निवृत्ती महाराज रायते, खडक माळेगाव.

सोमवार १९ सप्टेंबर सकाळी ८ ते १० काल्याचे किर्तन हभप पंडित महाराज कोल्हे पंढरपूर

मंगळवार २० ऑक्टोबर सकाळी ९ ते १२ नवचंडी याग विजयादशमी दसरा.

◆ **गायनाचार्य गुनिजन**

गायनाचार्य- हभप शिवराम महाराज बोराडे नाशिक, ह भ प दौलत महाराज ठोंबरे भोयेगाव, ह भ प गणेश महाराज भागवत आहेरगाव, ह भ प गयाजी महाराज महाले, ह भ प त्रंबक मेधने सर ,ह भ प परमार्थ प्रेमी समस्त भजनी मंडळ हिंगलाज नगर व पंचक्रोशी.

मृदंगाचार्य- हभप ओमकार महाराज रायते व सहकारी खडक माळेगाव.

विणेकरी- ह भ प विष्णु महाराज जेऊघाले, काशिनाथ दादा जेऊघाले.

ज्या भाविकांना व ग्रामस्थांना नवरात्रोत्सव काळात होणाऱ्या पूजाविधी पाद्यपूजा महानैवद्य महाआरती सेवा घ्यावयाची असेल त्यांनी संस्थान कार्यालयात नाव नोंदणी करावी असेही आवाहन श्री हिंगलाज देवी माता विश्वस्त समस्त ग्रामस्थ व भजनी मंडळ खेडे हिंगलाज नगर यांनी केली आहे.

---

## आदिवासी विद्यार्थ्यांचे अधीक्षकांनी केवळ कर्मचारी म्हणून नव्हे, पालक म्हणून संगोपन करावे

### आदिवासी आश्रमशाळा अधीक्षक संघटनेच्या विविध मागण्यांवर मंत्री डॉ.उईके यांच्याशी सकारात्मक चर्चा

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०७, डहाणू (पालघर) :** महाराष्ट्रातील शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये कार्यरत अधीक्षक व अधीक्षिका यांच्या विविध प्रलंबित सेवाविषयक व प्रशासकीय प्रश्नांबाबत शासकीय आदिवासी आश्रमशाळा अधीक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांची भेट घेऊन विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा केली.

यावेळी ‘अधीक्षकांनी केवळ नोकरी म्हणून काम न पाहता आदिवासी विद्यार्थ्यांचे पालक म्हणून संगोपन करावे,’ असे प्रतिपादन मंत्री डॉ. अशोक उईके यांनी केले.या बैठकीत अधीक्षक व अधीक्षिका संवर्गाच्या पदोन्नतीसह आश्रमशाळांमधील विद्यार्थी सुरक्षा, आवश्यक मनुष्यबळ, प्रशासकीय अधिकार, जुनी पेन्शन योजना, पायाभूत सुविधा, अधीक्षक-अधीक्षिकांवरील कामाचा ताण, तसेच सर्व आश्रमशाळांमध्ये सहाय्यक अधीक्षक, सहाय्यक अधीक्षिका आणि मध्यवर्ती स्वयंपाकगृह आदी महत्त्वाच्या विषयांकडे मंत्र्यांचे लक्ष वेधण्यात आले.

अधीक्षक व अधीक्षिका यांना दीर्घकाळ एकाच पदावर कार्यरत राहावे लागत असल्याने मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे पदोन्नतीची संधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी संघटनेने केली. त्यासाठी सेवाज्येष्ठता, अनुभव, शैक्षणिक पात्रता आणि विभागीय परीक्षा यांचा विचार करून पदोन्नतीची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली.

तसेच अधीक्षक व अधीक्षिकांना त्यांच्या अनुभव व पात्रतेनुसार वरिष्ठ आदिवासी विकास निरीक्षक, संशोधन सहाय्यक, नियोजन अधिकारी, गृहपाल आदी संबंधित पदांवर १०० टक्के पदोन्नतीचा मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही करण्यात आली. दिनांक १२ जून २००७ च्या अधिसूचनेमुळे निर्माण झालेल्या पदोन्नतीच्या अडचणींचा पुनर्विचार करून पदोन्नतीचा अनुशेष दूर करावा, अशी मागणी संघटनेने केली.

**जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी**

आदिवासी विकास विभागाच्या मंत्र्यांनी दिनांक ७ जानेवारी २००४ रोजीच्या अधिसूचनेनुसार अधीक्षक व अधीक्षिका यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

**विद्यार्थी सुरक्षेसाठी मनुष्यबळ वाढवा**

निवासी स्वरूपाच्या आदिवासी आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध असणे अत्यावश्यक असल्याचे संघटनेने निदर्शनास आणून दिले. प्रत्येक आश्रम शाळेत तीन शिफ्टमध्ये तीन सुरक्षा रक्षक उपलब्ध करून द्यावेत, वर्ग-४ कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरावीत, आवश्यक सफाई कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी करण्यात आली.



विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन प्रत्येक आश्रमशाळेत एक पुरुष सहाय्यक अधीक्षक व एक महिला सहाय्यक अधीक्षिका उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी करण्यात आली.

अधीक्षक व अधीक्षिका यांच्या कामकाजाच्या वेळा, साप्ताहिक सुट्टी, रजेच्या कालावधीत पदभार देण्याची व्यवस्था, विकलांग रजेच्या मंजुरीचे अधिकार तसेच दिनांक २७ जून २०१३ च्या शासन निर्णयानुसार रजेच्या अधिकारांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सर्व प्रकल्पांसाठी एकसमान प्रशासकीय कार्यपद्धती निश्चित करावी, अशी मागणी संघटनेने केली.

महिला अधीक्षकांना उन्हाळी व दिवाळीच्या दीर्घ सुट्यांचा नियमानुसार समान लाभ मिळावा, अशी मागणीही करण्यात आली.

**मध्यवर्ती स्वयंपाकगृह योजना टप्प्याटप्प्याने राबवावी**

विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उपयुक्त ठरलेल्या मध्यवर्ती स्वयंपाकगृह योजनेचा विस्तार करून राज्यातील सर्व शासकीय आदिवासी आश्रम शाळांमध्ये टप्प्याटप्प्याने ही व्यवस्था सुरू करावी, अशी मागणी संघटनेने केली. तसेच प्रत्येक आश्रमशाळेत सुरक्षित बालकांपसंद, आवश्यक तर फॅन्सिंग, मुलांना पौष्टिक सुविधा व दर्जेदार गाद्या उपलब्ध करून देण्याबरोबरच छझउठ च्या मार्गदर्शक तत्त्वांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली.

संघटनेच्या या सर्व मागण्यांवर मंत्री डॉ. अशोक उईके यांनी सकारात्मक भूमिका घेत चर्चा केली. अधीक्षक व अधीक्षिका संवर्गाच्या विविध प्रश्नांबाबत शासनस्तरावर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली.

या भेटीदरम्यान शासकीय आदिवासी आश्रमशाळा अधीक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष राजू सरदार, राज्य सोशल मीडिया प्रमुख योगेश चौधरी, विभागीय अध्यक्ष नाशिक योगेश घोगटे, विभागीय महिला अध्यक्ष हाणे भाग्यश्री जोगदंड, प्रकल्प अध्यक्ष डहाणू हनुमान डाखोरे,प्रकल्प अध्यक्ष नंदूरबार प्रदीप गवळी, प्रकल्प उपाध्यक्ष इंद्रदेव गेडाम तसेच पुरुषोत्तम काळे व संभाजीनगर उपस्थित होते.

---

## थोडक्यात बातम्या

### मुंबई विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेत आर.जे.कॉलेजचे विजेतेपद



**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०७, घाटकोपर (मुं.उपनगर) :** घाटकोपर येथील रामनिरंजन झुनझुनवाला महाविद्यालयाने (आर. जे. कॉलेज) मुंबई विद्यापीठातर्फे आयोजित आंतरमहाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धा २०२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद पटकावले. स्पर्धेदरम्यान आर.जे. कॉलेजच्या संघाने उल्लेखनीय सांघिक खेळाचे प्रदर्शन करत आपली गुणवत्ता सिद्ध केली. खेळाडूंनी आत्मविश्वास, शिस्त,जिद्द आणि उत्कृष्ट समन्वयाच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघांवर मात करत अंतिम विजेतेपद मिळवले. या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एका मानाच्या अध्यायाची भर पडली आहे.

संघाला पॅन्चो आचार्य आणि मधु शेट्टी यांचे मार्गदर्शन लाभले.त्यांच्या प्रशिक्षणामुळे आणि मार्गदर्शनामुळे संघाने स्पर्धेत सातत्यपूर्ण आणि प्रभावी कामगिरी केली. या उल्लेखनीय यशाबद्दल एचव्हीपीएसचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र सिंह यांनी विजयी संघाचे अभिनंदन केले. खेळाडूंच्या कामगिरीचे कौतुक करत त्यांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन दिले तसेच त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व आशीर्वाद दिले.एचव्हीपीएसच्या संचालिका डॉ.उषा मुकुंदन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हिमांशू दावडा, क्रीडा संचालक तथा उपप्राचार्य डॉ.यतीन राणे आणि डॉ.सीमा गाड्रे यांनीही विजयी संघ व प्रशिक्षकांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील यशासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने क्रीडा क्षेत्राला दिलेले प्रोत्साहन आणि खेळाडूंच्या अथक परिश्रमांना मिळालेले हे यश मानले जात आहे. या विजयामुळे आर.जे.कॉलेजच्या विद्यार्थी-खेळाडूंमध्ये नव्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून,महाविद्यालयाच्या क्रीडा परंपरेला अधिक बळ मिळाले आहे.

---

### जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रांजणगाव येथे पेविंग ब्लॉकचे उद्घाटन



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०७, सुपा (अहिल्यानगर) :** बुधवार, दिनांक ०७ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या ठिकाणी सुपा एमआयडीसी येथील नामांकित कंपनी सी.एम.एल या कंपनीमार्फत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रांजणगाव मशीद या ठिकाणी सीएसआर फंडातून पेविंग ब्लॉक देण्यात आले. त्यानिमित्ताने आज सी.एम.एल कंपनीचे सर्व पदाधिकारी या ठिकाणी शाळेमध्ये उपस्थित राहून उद्घाटन केले. यावेळी कंपनीचे प्लांट हेड विठ्ठल मुकुंदवार प्रोडक्शन हेड अभिजीत यादव एच.आर.हेड राहुल महाजन मटेरियल हेड धनंजय जोशी सीनियर ऑफिसर अश्विन शेळके कॉन्ट्रॅक्टर अमोल गाडेकर अक्षय गाडेकर अविनाश उबाळे हे उपस्थित होते.

त्याचबरोबर या कार्यक्रमासाठी गावातील मान्यवर राहुल शिंदे पाटील, सरपंच महेश देशमुख, प्राध्यापक शिंदे सर शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्राजक्ता चहाळ व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. प्लांट हेड विठ्ठल मुकांवर प्रोडक्शन हेड अभिजीत यादव या चार खेड राहुल महाजन यांनी आपल्या मनोगतामध्ये शाळेचे विशेष कौतुक करून शाळेतील व्यवस्थापनाबद्दल आनंद व्यक्त केला. त्यावेळेस कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेतील उपाध्यापक पठारे संदीप यांनी केले तर सर्व मान्यवरांचे स्वागत शाळेतील उपाध्यापिका गंधाडे रूपाली यांनी केले सर्वांचे आभार शाळेतील मुख्याध्यापिका वंदना आसणे यांनी मानले.

---

### महाराष्ट्र विद्यालयाचे वेटलिफ्टर राज्यस्तरावर

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.०७, नागपूर :** तनिष्क कॉलेज ऑफ नर्सिंग राजीव नगर नागपूर येथे संपन्न झालेल्या शालेय विभागीय वेटलिफ्टींग स्पर्धेत खापरखेडा येथील महाराष्ट्र विद्यालयातील वेटलिफ्टरनी अतुलनीय कामगिरी करून आपापल्या वयोगट व वजनगटामध्ये प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक प्राप्त केले. १७ वर्ष वयोगटात मुलींमध्ये ५३ किलो खालील शुती बावणे प्रथम, ७७ किलो खालील पलक थुलकर प्रथम तर १९ वर्ष वयोगटात मुलांमध्ये ६० किलो खालील नैतिक गौरखेडे प्रथम,६५ किलो खालील मंथन ढोके प्रथम, ११० किलो वरील रेहान पाटिल प्रथम, तर महिमा थुलकर, मृणाली ठाकरे, स्वरीत गौरखेडे, आदित्य वारकर यांना मात्र व्दितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले. वरील सर्व प्राविण्य प्राप्त खेळाडूंना क्रीडाशिक्षक धैर्यशील सुटे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रथम क्रमांक प्राप्त करणारे खेळाडू अमरावती येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय वेटलिफ्टींग स्पर्धेत नागपूर विभागाचे प्रतिनिधित्व करतील. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक व विश्वस्त सुनील केदार,अध्यक्ष सुधीर केदार, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर, उपमुख्याध्यापक जितेंद्र ठाकरे ,पर्यवेक्षक नरेंद्र माहूरतळे, क्रीडा शिक्षक धैर्यशील सुटे, धर्मेंद्र सूर्यवंशी, सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी वर्ग यांनी विजयी वेटलिफ्टरचे अभिनंदन केले.

---

### खापरखेडा येथे रोटरी क्लबतर्फे १०० देशी वृक्षांचे रोपण




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०७, नागपूर :** महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खापरखेडा येथे रोटरी क्लब ऑफ नागपूर मिहान टाऊन आणि रोटरॅक्ट क्लब ऑफ प्रियदर्शिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेत ३० विविध प्रजातींची १०० देशी झाडे लावण्यात आली. पर्यावरण संवर्धन आणि शाळेचा परिसर हिरवागार करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर उपमुख्याध्यापक जितेंद्र ठाकरे, पर्यवेक्षक नरेंद्र माहूरतले सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी लावलेल्या सर्व रोपांचे नियमित संगोपन, पाणी व संरक्षण करण्याची जबाबदारी शाळा घेईल असे आश्वासन दिले.या कार्यक्रमाला रोटरीचे अध्यक्ष रोटे. अभय हराणे, सचिव रोटे. डॉ. ममता लांजेवार, प्रकल्प संचालक रोटे. पूनम हराणे, रोटे. अनुप यावलकर, रोटे. डॉ. सौरभ शहा, रोटे. सुहास गायनकर यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण झाली आहे.